दैनिक अन्यायाचा प्रतिकार महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी


● वर्ष १६ वे ● अंक २६३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१८ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### वाशी विभागाचे अधिक्षक अभियंता राजाराम माने यांची धडाकेबाज कारवाई

# पनवेल येथे १ कोटी २९ लाखाची वीज चोरी उघडकीस

**दै.रायगड नगरी । उरण**

**महावितरण पनवेल विभागात उच्चदाब ग्राहक मे. ऑस्कर इन्फ्रा या स्टोन क्रशरच्या मीटरचा एमआरआय अहवालची चाचणी केली असता चाचणीमध्ये अनियमितता आढळून आली व जून २०२१ पासून कमी नोंद होत असल्याचे दिसून आले. कंपनीचे मालक जियाउद्दीन इक्बाल पटेल यांची १ कोटी २९ लाख १६ हजार रुपयेची ७,२३,६९८ केव्हीएच युनिटची वीजचोरी वाशी मंडळाने उघडकीस आणली आहे व उद्योजकाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




उच्चदाब ग्राहकांचा मीटरचा एमआरआय अह-वाल दर महिन्याला घेतला जातो.वाशी मंडळ कार्यालया अंतर्गत मे. ऑस्कर इन्फ्रा ग्राहक बंबावी गाव,ता .पनवेल जि.रायगड या उच्चदाब ग्राहकाच्या एमआरआय अहवालात माहे जून २०२१ पासून कमी नोंद होत असल्याचे वाशी मंडळ कार्यालयातील उच्चदाब बिलिंग विभागास दि .५ डिसेंबर २०२१ रोजी निदर्शनास आले.त्यामुळे अधीक्षक अभियंता वाशी मंडळ श्री. राजाराम माने यांनी मीटरच्या तांत्रिक तपासणी करिता चाचणी विभाग वाशी यांना सांगितले. त्याप्रमाणे दि.६ डिसेंबर २०२१ रोजी चाचणी विभाग व श्री. माने सदर मीटरच्या ठिकाणी गेले व त्या जागी तपासणी केली असता मे. जिनस कंपनी कढुन लावण्यात आलेल्या मीटरच्या सीलची एक तार तुटलेल्या अवस्थेत आढळून आली. सदर मिटरची लोड टेस्ट केली असता मीटर मध्ये कमी वीज वापराची नोंद होत असल्याचे तपासणीतून उघड झाले. दि.७ डिसेंबर २०२१ रोजी वाशी येथील चाचणी विभागाच्या प्रयोगशाळेत वीज ग्राहक जियाउद्दीन इकबाल पटेल, मे. जिनस या कंपनीचे प्रतिनिधी, अधीक्षक अभियंता वाशी मंडळ श्री. राजाराम माने, चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. बोडखे, अति. कार्यकारी अभियंता श्री. चोपडे व इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत वरील मीटरची तपासणी केली असता मीटरच्या सिटी सेकंडरी मध्ये बाह्य वस्तू बसवून तसेच वास्तविक वीज वापरापेक्षा कमी वीज वापराची नोंद होण्याची सहहेतुक व्यवस्था केली असल्याचे उघड झाले.

सदर मीटर जप्त करण्यात आले असून सदर ग्राहकाने दि.१ जून २०२१ ते १ डिसेंबर २०२१ या कालावधीत मीटर मध्ये फेरफार करुन स्टोन क्रशर कंपणीसाठी ७,२३,६९८ केव्हीएच युनिटची रु.१ कोटी २९ लाख १६ हजार ३०३ ची वीजचोरी केल्याचे उघड झाले. त्यामुळे जियाउद्दीन इकबाल पटेल यांच्या विरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ (१)(ब) व कलम १३८ (ड) अन्वये पनवेल शहर पोलीस ठाण्यात वाशी मंडळचे अधीक्षक अभियंता, श्री. राजाराम माने यांनी गुन्हा दाखल केला असून सदर ग्राहकाने कारवाईच्या भीतीने त्वरित रु.१ कोटी २९ लाख १६ हजार ३०३ महावितरणकडे भरले. या कारवाई दरम्यान असे समजले की सदर ग्राहकाचे कुंडेवहाळ गाव, पनवेल येथे याच नावाने स्टोन क्रशर कंपनी आहे. त्या जागेची तपासणी केली असता तेथे ही वीजच-ोरी करीत असल्याचे समोर आले. या प्रकरणात सुद्धा मालक जियाउद्दीन इक्बाल पटेल व त्यांचे दोन भागीदार रफिउद्दिन इकबाल पटेल व खालिद इकबाल पटेल या तिघांवर मे २०२१ ते ९ डिसेंबर २०२१ या कालावधीत ५,९४,७११ केव्हीएच युनिटची रु. १ कोटी १५ लाख, ८७ हजार ९९९ ची वीजचोरी केल्याचा गुन्हा नोंदवला आहे. ही वीजचोरी उघड करण्यात वाशी मंडळाच्या चाचणी विभागाने विशेष मेहनत घेतली असून मुख्य अभियंता भांडूप परिमंडळ सुरेश गणेशकर यांनी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. वीजचोरी करणे एक असामाजिक कृत्य आहेच शिवाय एक गुन्हा देखील आहे. ग्राहकांनी असा कृत्यापासून दूर राहावे. ग्राहक वीजचोरी करित असल्याचे आढल्यास सदर ग्राहकावर असाच गुन्हा दाखल करण्यात येईल. यामध्ये ग्राहकास रोख दंडाशिवाय अटक सुद्धा होऊ शकते. म्हणून प्रामाणिकपणे विजेचा वापर करुन वापरलेल्या विजेचे पैसे भरावे असे आवाहन भांडूप परिमंडळचे मुख्य अभियंता सुरेश गणेशकर यांनी केले आहे.

## सीएनजी, घरगुती पाईपलाईन गॅस ग्राहकांना झटका; मध्यरात्रीपासून मोठी दरवाढ

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**



एकीकडे पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी सिलिंडरचे दर गगनाला भिडलेले असताना आता परवडणाऱ्या सीएनजी आणि घरगुती गॅस पाईपलाईनचे दरही वाढणार आहेत. यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला आणखी झळ बसणार आहे.

एमजीएलने १७ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून ही दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यान-ुसार सीएनजीचा दर दोन रुपये प्रति किलोला वाढविण्यात येणार आहे. तर डोमेस्टिक पीएनजीचा दर १.५०/SCM² रुपयांनी वाढविण्यात येणार आहे. ही दरवाढ १७ आणि १८ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून केला जाणार आहे.

ही दरवाढ मुंबईत केली जाणार असल्याचे एमजीएलने सांगितले आहे. यामुळे दर वाढविल्यानंतर सीएनजीचे नवे दर ६३.५०/ Kg आणि पीएनजीचे नवे दर ३८.००/SCM होणार आहेत. ही दरवाढ झाली तरी देखील पेट्रोलशी तुलना केल्यास सीएनजी ग्राहकांचे ६० टक्के आणि डिझेलशी तुलना केल्यास ३३ टक्के पैसे वाचणार असल्याचा दावा महानगर गॅसने केला आहे.

तसेच एलपीजी ग्राहकांपेक्षा पीएनजी ग्राहकांची २४ टक्के पैशांची बचत होणार असल्याचे एमजीएलने म्हटले आहे.

## दिघी-पुणे महामार्गावर होतेय वाहनांची आदळआपट

### करलास येथील मोरी खचल्याने प्रवास बनला धोकादायक



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - श्रीवर्धन तालुक्यातील दिघी पोर्टमुळे दिल्ली - मुंबई कॅरिडोर प्रकल्पात तयार होत असलेला महामार्ग पूर्ण होण्याआधीच खचला आहे. त्यामुळे महार्गावरील प्रवास धोकादायक बनला आहे.

दिघी ते पुणे या राष्ट्रीय महामार्गाला दिघी येथून सुरुवात होते. मात्र, सुरुवातीलाच दिघी गावाजवळील ३ किलोमीटर अंतरावर मोरी खचल्याने प्रवास धोकादायक बनला आहे. सध्या या रस्त्यावरील कामे पूर्ण होत आहेत. मात्र, या गुळगुळीत रस्त्यावर वेगात येणारे वाहनांची आदळआपट होत असल्याचे घटनांत वाढ होत आहे.

दिघी - वेळास या ८ किलोमीटर अंतरात टप्प्याटप्प्याने रस्ता तयार होत आहे. याच मार्गावर दिघी पोर्ट कडील लाईन स्टोन, कोळसा व कॉइलची ओव्हर लोड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे. या अवजड वाहतुकीने करलास जवळील साकव खचल्याने रस्त्याला मोठा खड्डा तयार झाला आहे. अशा अनेक पुलावरील कामे दुर्लक्षित असल्याने चारचाकी वाहनांसह दुचाकीला अपघात होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग एमएसआरडीसीच्या अखत्यारीत असून गेल्या पाच वर्षापासून हा रस्ता जे एम म्हात्रे या कंत्राटदारांनी बनवण्यास घेतला आहे. महामार्गावरील प्रवास सद्यस्थितीत वेगवान बनला असला तरी, मोरीवरील रस्ता मोठ्या प्रमाणात खचत आहे. अधिक माहितीसाठी एमएसआरडीसीच्या विभागात संपर्क साधला असता नॉट रीचेबल उत्तर मिळत आहे. त्यामुळे महामार्गाच्या उभारणीत दिघी - करलास रस्त्याकडे दुर्लक्ष का ? अशी विचारणा येथील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

दिघी - माणगाव महामार्गातील पुलांवरील मोरी खचल्याने वाहनांना दणके बसत आहेत. सुरुवातीला रस्त्यावरील .../२

### सातारा येथील कॉलेजमध्ये 'लोकनेते रामशेठ ठाकूर' सभागृह

## डॉ. अनिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले उदघाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमध्ये कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्व असलेले 'लोकनेते रामशेठ ठाकूर' यांच्या नावाने सभागृह उभारण्यात आले असून या सभागृहाचे उद्घाटन आज (दि. १७) मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली, संस्थेचे सल्लागार ॲड. दिलावर मुल्ला यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या सोहळ्यात संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते 'लोकनेते रामशेठ ठाकूर सभागृह' चे उद्घाटन करून कॉलेजमधील विद्यार्थी व शिक्षकांसाठी समर्पित करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सुजाता पवार रयत सेवक उपस्थित होते.

शंभरातून एखादाच शूरवीर मनुष्य जन्मतो, हजारातून एखादाच विद्वान मनुष्य, उत्कृष्ट वक्ता दहा हजारांतून एखादा जन्मतो. परंतु दातृत्वाची संवेदना असणारा दाता हा क्वचितच पाहायला मिळतो. असेच एक दाता, दानशूर व्यक्तिमत्त्व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या रूपाने लाभला आहे. . शाहू, फुले, आंबेडकर, यांच्या विचाराची प्रेरणा घेऊन ते पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शिक्षण वारसा घेऊन काम करीत आहेत. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी .../२

## खोपोलीजवळ अपघात १ ठार 3 जखमी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर अपघातांची मालिका थांबता थाबेना नुकताच किलोमीटर ३६ जवळ रस्त्याचे रुंदीकरण सुरू असल्याने काम सुरू आहे याचं ठिकाणी तीन कामगारांचा वाहनांच्या अपघातामुळे मृत्यू झाला होता. या घटनेला २४ तास उलटता तोच पुन्हा याच की मी ३६ वर पुन्हा अपघात झाला असून रात्री भरधाव वेगात मुंबईच्या दिशेने येणाऱ्या ट्रकने येथे असणाऱ्या उभ्या ट्रकला धडक दिल्याने याच कंपनीचा चालक रस्त्याच्या बाजूला उभा असताना ट्रकची जोरदार धडक बसल्याने जागीच ठार झाला तर एकामागोमाग चार वाहने एकमेकांवर आदलल्याने अन्य तीन जण जखमी झाले त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की बोरघतात द्रुतगती महामार्गावर की मी ३६ जवळ महामार्ग रुंदीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे खोपोली एक्झिट च्या पुढे पुण्याकडून .../२



# विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर गदा

आपल्याकडील विद्यापीठांचा दर्जा उंचावण्यासाठी, त्यांमधील संशोधन आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्यासाठी; तसेच जागतिक क्रमवारीत पहिल्या शंभरात स्थान मिळविण्यासाठी त्यांना अधिकाधिक स्वायत्तता देण्याचा आणि त्यांच्या कार्यातील सरकारी हस्तक्षेप पूर्णपणे थांबविण्याचा सल्ला केंद्र व राज्य सरकारने नेमलेल्या विविध तज्ज्ञ समित्यांनी सातत्याने दिला आहे. त्याची अंमलबजावणी करण्याऐवजी, विद्यापीठांना अधिकाधिक अंकित करण्याचा प्रयत्न राज्यात होतो आहे. कुलगुरूंची निवड सरकारद्वारे करण्याला आणि उच्च शिक्षणमंत्र्यांसाठी प्र-कुलपती हे पद निर्माण करण्याला मंत्रिमंडळाने बुधवारी दिलेली मंजुरी, हे याचे ताजे उदाहरण. विद्यापीठांचे ठळक निर्णय असोत, की कुलगुरूंची नियुक्ती, यांमध्ये पूर्वीपासूनच राज्य सरकार भूमिका बजावत आले आहे; परंतु मंत्रिमंडळाच्या नव्या निर्णयाचा समावेश विद्यापीठ कायद्यात झाल्यास, सरकारच्या या भूमिकेला वैधानिक अधिष्ठान प्राप्त होईल. एक प्रकारे विद्यापीठांमधील सरकारच्या, विशेषत: उच्च शिक्षणमंत्र्यांच्या हस्तक्षेपाला अधिमान्यता मिळेल. शिक्षण हा राजकीय प्रक्रियेचा एक भाग असल्याचे मान्य केले, तरी त्याचे राजकीयीकरण होणे धोकादायकच. अभ्यासक्रम निश्चित करण्यापासून परीक्षा घेण्याच्या निर्णयांमध्ये राज्य सरकारने किंवा उच्च शिक्षणमंत्र्यांनी हस्तक्षेप केल्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. नव्या निर्णयामुळे त्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक. एकीकडे, शिक्षणासाठीचा सरकारचा खर्च कमी होतो आहे, नवी पदे मंजूर करणे सोडाच; परंतु प्राध्यापकांच्या रिक्त पदांचीही भरती केली जात नाही आणि दुसरीकडे, सरकार विद्यापीठांमधील आपली लुडबूड वाढवित आहे. अशा स्थितीत आपल्या विद्यापीठांकडून आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरी करण्याची अपेक्षा करायची तरी कशी, असा प्रश्न आहे. महाविकास आघाडी सरकार आणि राज्यपाल यांच्यात अनेक मुद्द्यांवर मतभेद आहेत; त्यांपैकी काही विषयांवरून संघर्षही झाला आहे. विद्यापीठांबाबतच्या नव्या निर्णयाच्या मुळाशी सरकार आणि राज्यपाल यांच्यातील वादाचा मुद्दा असेल, तर ते आणखी दुर्दैवी म्हणावे लागेल. पदांवरील व्यक्ती बदलत असतात; परंतु संस्था कायम असतात. त्यामुळे विशिष्ट व्यक्तीला डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेणे चुकीचे. कुलगुरूंची नियुक्ती राजभवनातून नव्हे, तर मंत्रालयातून करण्यासाठी असे पाऊल उचलणे गरजेचे नव्हते. कुलगुरूपदासाठीचे निकष राष्ट्रीय पातळीवरून ठरविले गेले आहेत. कुलगुरूंच्या निवडीसाठी शोध समिती असते. पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन ही समिती काही नावे निश्चित करते आणि त्यांची यादी कुलपतींकडे म्हणजेच राज्यपालांकडे पाठविते. यादीतील सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेऊन कुलपती निवड करतात. राज्य सरकार किंवा उच्च शिक्षणमंत्र्यांना विशिष्ट उमेदवार अभिप्रेत असेल, तर त्याचे नाव यादीत येईल हे पाहिले जाते, असा अनुभव आहे. याच उमेदवाराला कुलगुरू करण्याचे प्रकार यापूर्वी घडले आहेत; तसेच अशा उमेदवाराला कुलपतींनी नाकारल्याच्या घटनाही आहेत. नव्या नियमानुसार आता शोध समिती पाच उमेदवारांची यादी राज्य सरकारला देईल आणि सरकार त्यातून दोघांची नावे निश्चित करून कुलपतींना देणार आहे. साहजिकच, ही दोन्ही नावे सरकारच्या पसंतीची असणार. कुलगुरूपदाला पात्र ठरण्यासाठी विद्वत्ता, व्यासंग, संशोधनाची वृत्ती, अध्यापनाचा अनुभव, प्रशासन कौशल्य यांच्या जोडीला सत्ताधाऱ्यांशी संबंध हा नवीन निकष यामुळे कायदेमान्य ठरेल. यापूर्वीही या निकषाचा विचार होत असे; परंतु तो छुपा होता. राजकीय हेतूंनी प्रेरित व्यक्ती पदाला न्याय देऊ शकणार नाही असे नाही; परंतु अशी व्यक्ती विद्यापीठाच्या स्वायत्ततेपेक्षा सरकारची मर्जी सांभाळण्यावर भर देते, असा अनुभव आहे. सध्याच्या रचनेत कुलगुरू कुलपतींना उत्तरदायी आहेत; आता ते प्र-कुलपतींना म्हणजेच उच्च शिक्षणमंत्र्यांना उत्तरदायी होतील. लॉकडाउनच्या काळात राज्यात काही विद्यापीठांचे कुलगुरू आणि उच्च शिक्षणमंत्री यांच्यात काही मुद्द्यांवरून मतभेद झाले. परीक्षा रद्द करण्यापासून त्या ऑनलाइन घ्याव्यात की ऑफलाइन, यांबाबत झालेल्या मतभेदांमुळे विद्यार्थ्यांचा संभ्रम वाढला होता. कुलगुरूंनी निर्णय घ्यावा आणि उच्च शिक्षण विभागाने तो मागे घेण्यास भाग पाडावा, असेही घडले आहे. विद्यापीठांनी आणि कुलगुरूंनी आपले ऐकले पाहिजे, ही सरकारची भूमिका शैक्षणिक धोरणांबाबत योग्य; परंतु विद्यापीठांच्या कामकाजासाठी कायदे आणि नियम आहेत. शिवाय अधिसभा, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद या वैधानिक समित्या आहेत. एखादा कुलगुरू त्यांनाही न जुमानता काम करीत असेल, तर त्याच्यावर नियमामुसार कारवाई करता येऊ शकते. त्यासाठी प्र-कुलपती या पदाची आवश्यकता नव्हती. वास्तविक, सरकारने विद्यापीठांना अधिक निधी देण्याची, अभ्यासक्रमापासून परीक्षांपर्यंत विविध प्रयोग करण्यास भाग पाडण्याची आणि गुणवत्ता उंचावण्यात उत्प्रेरक म्हणून काम करण्याची गरज आहे; त्याची पूर्तता करण्याचे प्रयत्नही होताना दिसत नाहीत.

# स्वत:च्या जीवाचा विचार न करता काश्मीरमध्ये विद्यार्थ्यांसाठी काम केले : सारंग गोसावी

**दै.रायगड नगरी । पेण**



पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने महाविद्यालयात ७५ व्या स्वातंत्र्यानिमित्त ७५ सामाजिक उपक्रमांची नांदी या कार्यक्रमाचे उद्घाटन स्वतः च्या जीवाचा विचार न करता काश्मीर मध्ये विद्यार्थ्यांसाठी काम केलेले असीम फाउंडेशन पुणेचे संस्थापक अध्यक्ष सारंग गोसावी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी योगेश निखारे निर्मित लोगोचे अनावरण करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर जेष्ठ समाजसेवक बापूसाहेब नेने, असीम फाउंडेशन पुणेचे संस्थापक सारंग गोसावी, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, कार्यकारणी सदस्य वसंत आठवले, प्रशांत ओक, संजय कडू, सुधीर जोशी, प्राचार्य सदानंद धारप, योगेश निखारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बापूसाहेब नेने म्हणाले की, स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण होताना महाविद्यालयाकडून वर्षभरात ७५ सामाजिक उपक्रम राबिवले जाणार आहेत.

त्यामध्ये सोबती संस्थेकडून सहकार्य करून काही कार्यक्रम राबवणार आहोत. तर मंगेश नेने यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत सदर कार्यक्रमासाठी आर्थिक मदत म्हणून धनादेश दिला.

यावेळी असीम फाउंडेशन पुणेचे संस्थापक अध्यक्ष सारंग गोसावी यांची महाविद्यालयाचे प्राचार्य सदानंद धारप यांनी विविध विषयांवर मुलाखत घेतली. त्या मुलाखतीत सारंग गोसावी यांनी स्वतः च्या जीवाचा विचार न करता काश्मीर येथे असीम फाउंडेशन कडून विद्यार्थ्यांसाठी केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत अनेक विषयांचा उलगडा केला.

# कोलाड़, खांब, पुगांव, नडवली,चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे पिंपळवाडीत दत्त जयंती उत्सव सोहळा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील कोलाड़ खांब पुगांव,नडवली चिल्हे,देवकान्हे (पिंपळवाडी) या विभागात ठीक ठिकाणी सालाबाद प्रमाणे धार्मिक आणि पारंपरिक पद्धतीने शनिवारी ता १८ डिसेंबर रोजी दत्त जयंती निमित्ताने दत्त जयंती जन्मोंउत्सव व विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपन्न होत आहे.

सदरच्या कार्यक्रमात श्री गुरुदेव दत्तात्रेय जन्मउत्सव श्री दत्त पूजा पाद्य पूजन महाभिषक तद् नंतर श्री सत्यनारायणाची महापूजा तसेच विविध ठीक ठिकाणी सांयकाळी ६ ते ७ या वेळेत हरिपाठ तसेच विविध धार्मिक कार्यक्रम साजरे केले जाणार असून देवकान्हे पिंपलवाड़ी येथ रोहा तालुका कोकणदिंडी वारकरी संप्रदाय हरिपाठ तसेच ८ ते ९ या वेळेत महाप्रसाद तद्नंतर ह भ प दिनेश महाराज कडव (वांदोली) रोहा यांचे सुश्राव्य कीर्तन रुपी सेवा या कार्यक्रमाच्या निमित्ताने होणार आहे

रात्रौ देवकान्हे,पिंपलवाड़ी ग्रामस्थ व महिला मंडळ यांचा भजन जागर होणार आहे तसेच कोलाड़ खांब पुगांव नडवली चिल्हे धानकान्हे या ठिकाणी देखील मोठ्या उत्साह वातावरणात भजन कीर्तन जागर होणार आहे व विविध विधिवत पूजा तसेच धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

# ओबीसी जनमोर्चाच्या वतीने ओबीसी समाजावरील अन्यायाच्या निषेधार्थ पनवेलमध्ये रास्ता रोको व निदर्शने

**दै.रायगड नगरी । उरण**



मा. सुप्रिम कोर्टात स्थानिक स्वराज्य संस्थामधील ओबीसी लोकप्रतिनिधी आरक्षण कायम ठेवण्यात अपयशी ठरलेल्या महाराष्ट्र सरकारचा ओबीसी जनमोर्चाच्या वतिने खांदा कॉलोनी पनवेल येथे महिला प्रदेशाध्यक्ष श्रुती म्हात्रे यांनी रास्ता रोको आंदोलन व जनआक्रोष निदर्शने करून जाहीर निषेध केला.

आरक्षण आमच्या हक्काचे.,,,! नाही कुणाच्या बापाचे..! ओबीसींचे आरक्षण संपवणाऱ्या महाराष्ट्र सरकारचा निषेध असो..! जातवार जनगणना नाकारणाऱ्या केंद्र सरकारचा निषेध असो..! ओबीसींना निधी न देणाऱ्या अर्थ मंत्र्यांचा निषेध असो.! ओबीसी एकजुटीचा विजय असो..! छत्रपती शिवाजी महाराज कि जय..! आरक्षणाचे जनक लोकराजा शाहू छत्रपतींचा विजय असो..! महात्मा जोतिराव फुलेंचा विजय असो.! विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय अशा घोषणांनी पनवेल मधील खांदा कॉलोनी परिसर दणाणून गेला.

यावेळी श्रुती म्हात्रे यांनी गेले नऊ महीने महाराष्ट्र सरकारने ओबीसी लोकप्रतिनिधी आरक्षण टिकविण्यासाठी अक्षम्य दिरंगाई केल्यानेच, तसेच इंपेरिकल डाटा तयार करण्यासाठी महाराष्ट्राचे अर्थमंत्री जाणिवपुर्वक टाळाटाळ करतात याचा निषेध केला. तसेच ओबीसी आरक्षणाला धक्का लावून राज्य सकारने ओबीसींच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. नाकर्त्या केंद्र सरकारने ओबीसींची जातवार जनगणना करण्यास टाळाटाळ करत आहे याचाही निषेध केला.तसेच मुंबई सह महाराष्ट्रातील महानगरपालिका व नगरपालिका च्या निवडणुका ओबीसी आरक्षणा शिवाय होऊच नये अशी मागणी या रास्ता रोको निमित्ताने केली सदरच्या आंदोलनात ओबीसी नेते श्री बाजपेयीं, सान्नि वलिका, देवीदास थळी यांच्या सह अनेक ओबीसी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.संजय कटेकर, कार्यकारी अभियंता (प्रकल्प), बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | १४ गुलमोहर<br>११ सप्तपर्णी<br>०३ अशोक<br>०२ जंगली<br>०१ बदाम<br>०१ बोर<br>०१ करंज<br>०१ रेन ट्री<br>०१ पपई<br>अशी एकूण ३५ झाडे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'क', प्रभाग क्र.१४ मधील अं.भू.क्र.१८ ते सर्व्हे नं.७९७ (पमपा पाण्याची उंच टाकी ते गणेश मंदिर ते लामेर कॉम्प्लेक्स) साईनगर रस्ता काँक्रीटीकरण करणे या कामाचे कार्यादेश मे.ठाकूर इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. यांना दिले असून सदर कामामध्ये ३५ झाडे बाधित होत आहेत. बाधित झाडे तोडल्याशिवाय गटाराचे काम करणे शक्य होणार नाही. तरी ३५ झाडे तोडण्याची परवानगी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त I (मुख्यालय)**
**पनवेल महानगरपालिका**

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.९६/४७७/२०२१
दिनांक : १७/१२/२०२१

# कासारभाट येथे अनधिकृत वाळू उपसा करणाऱ्या अज्ञातांवर पनवेल महसुलची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कासारभाट येथे अनधिकृत वाळू उपसा करून बेकायदा वाळूची साठवणूक केली असल्याची माहिती पनवेल महसूल विभागास गोपनीय सूत्रांकडून मिळाली.

कासारभाट ते डोलघर जुन्या रस्त्याच्या डाव्या बाजूला जमिनीतून सक्शन पंपाच्या साहाय्याने वाळू काढलेली दिसून आली. तसेच सदर रस्त्याच्या किनारी वाळू साठवण्याकरिता तयार केलेली कुंडी निदर्शनास आली.

परंतु त्या कुंडीत वाळूचा साठा दिसून आला नाही. त्याचप्रमाणे त्याठिकाणी कोणीही उपस्थित नसल्याने वाळू उत्खनन कोणी केले याबाबत देखील महसूल विभागाला अद्याप सापडले नाही.

सदर ठिकाणी सक्शन पंपात पाणी शिरून बुडालेल्या अवस्थेत दिसून आले. त्या अनुषंगाने गुरुवारी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी विश्वनाथ कचरे पाटील, श्रीनिवास पाटील, भावेश पाटील यांनी जेसीबीच्या साहाय्याने सदर वाळूचा साठा नष्ट केला. तसेच याबाबत गुन्ह्याची नोंद देखील करण्यात आली आहे.

# इंटरनॅशनल हुमन राईट्स ऑरगनायजेशनच्या तालुका उपाध्यक्षपदी उदय म्हात्रे

**दै.रायगड नगरी । उरण**

इंटरनॅशनल हुमन राईट्स ऑरगनायझेशन हि संघटना मानवी हक्काच्या क्षेत्रात कार्यरत असून विविध समस्यांना वाचा फोडण्याचे काम राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर या संघटनेच्या माध्यमातून होत असते. या संघटनेचे कार्य व विचार तळागाळात जावेत, गोर गरिबांना न्याय मिळावा या दृष्टीकोनातून या संघटनेच्या उरण तालुकाउपाध्यक्ष पदी केगाव येथील रहिवाशी तथा सामाजिक कार्यकर्ते उदय केसरीनाथ म्हात्रे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेने आतापर्यंत अनेक समस्यांना न्याय दिला आहे. या संघटनेच्या उरण तालुका उपाध्यक्षपदी उदय केसरीनाथ म्हात्रे यांची नियुक्ती झाल्याने त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.उदय म्हात्रे हे भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते असून उरण तालुका भाजप कायदेविषयक सल्लागार म्हणून ते महत्वाची जबाबदारी सांभाळत आहेत. या माध्यमातून त्यांनी अनेक कामगारांना न्याय मिळवून दिला आहे.

## ग्रामपंचायत कोळखे
ता.पनवेल, जि.रायगड
### जाहीर निविदा

दि. १७/१२/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १८/१२/२०२१ ते २७/१२/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. २८/१२/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | निधी |
|---|---|---|---|---|
| १ | कोळखे येथील बौद्धविहार ते संभाजी पाटील यांच्या घरापर्यंत ४ इंची पी.यु.सी.पाईप लाईन टाकणे | ४९७०४२/- | ४९७०/- | ग्रामनिधी |
| २ | कोळखे हद्दीतील बौद्धवाडी सार्वजनिक शौचालयाला नळ कलेक्शन व पाण्याची टाकी बसविणे | ९६९२८/- | ९६९/- | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## दिघी-पुणे महामार्गावर होतेय वाहनांची आदळआपट

साकव तयार केल्यानंतर परत त्यांच्याकडे कंत्राटदार किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडून बघण्यात आले नाही. यामुळे संपूर्ण रस्ता उंच आणि त्याला जोडले गेलेले साकव समांतर नसल्याने रस्त्यावरून जाताना अचानक खड्डा आल्याने दुचाकीस्वारांची तारांबळ उडत आहे. याठिकाणी तोल जाऊन दुचाकीस्वार खाली कोसळून जखमी झाल्याचे प्रकारही घडत आहेत. त्यामुळे हा रस्ता सारख्या पातळीचा करून कंत्राटदाराने रस्त्यांचे काम तात्काळ करावे अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

रस्ते हा पायाभूत सुविधांचा मूलभूत घटक आहे. आपण रस्त्यांचे जाळे चांगल्यापैकी विणतो, आपल्याकडे तंत्रज्ञानदेखील अद्ययावत आहे. पण तरीदेखील काही कमतरता जाणवत राहतेच. मात्र, यासाठी जनसेवेत असणाऱ्या लोकप्रतिनिधीकडून तालुक्यातील विशेषतः रस्ते बाबत असुविधेकडे सर्रास दुर्लक्ष होते.

## डॉ. अनिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले उदघाटन

सतत लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे योगदान महत्वपूर्ण ठरले आणि त्यामुळे रयत शिक्षण संस्थेच्या जबाबदारीचे कर्तव्य भावनेत रूपांतर करून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल, नवी मुंबई व रायगड आणि राज्यातील इतर अनेक शाखा सोयीसुविधा युक्त करण्यासाठी पुढाकार घेतला. आपल्या सेवाभावी वृत्तीचे सदोदित दर्शन घडवत रयतेचे शैक्षणिक काम म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचे काम आहे असे समजून सदैव त्यात झोकून देवून शैक्षणिक प्रगतीची दारे त्यांनी सर्वांना खुली केली. मानवता सेवा आणि स्वावलंबनाचे बाळकडू सातारा येथील शिवाजी कॉलेज येथे शिकताना 'कमवा आणि शिका' या योजनेत त्यांना मिळाले होते. आणि त्याचा त्यांना कधीही विसर पडला नाही. त्यामुळे रयतेच्या सेवेसाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमध्ये सभागृह उभारण्यात आले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे समाजाप्रती कार्य अफाट आहे. रयत शिक्षण संस्थेच्या विकासाच्या उपक्रमात त्यांचा नेहमी हातभार असतो. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे 'लोकनेते रामशेठ ठाकूर भवन' साकारले आहे. लवकरच या भवनाचे लोकार्पण होणार आहे.

## खोपोलीजवळ अपघात १ ठार ३ जखमी

मुंबई कडे जाणारी वाहने उतार असल्याने भरधाव वेगात येत असताना त्यामुळे चालकाचा अंदाज चुकून अपघाताच्या घटना वारंवार घडत आहेत. दोन दिवसांपूर्वी या ठिकाणी काम करणाऱ्या तीन कामगारांचा वाहनांची धडक बसून मृत्यू झाला होता त्यानंतर पुन्हा त्याच ठिकाणी अप्सकॉन कंपनीचा चालक शैलेश गडपाले ट्रक जवळ रस्त्याच्या बाजूला उभा असताना पुण्याहून भरधाव वेगात येणाऱ्या दुसऱ्या ट्रकने उभ्या ट्रक ला जोरदार धडक दिल्याने बाजूलाच उभा असणारा कंपनीचा चालक शैलेश गडपाले हा ट्रक खाली घसरल्याने जबर मार लागून जागीच ठार झाला तर या अपघातात एकामागून एक अशी चार वाहने एकमेकांवर आदळल्याने यात अन्य तीन कामगार जखमी झाले आहेत. या अपघातमुळे या ठिकाणी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्टद्वारे कोरोना संरक्षक कीटचे वाटप



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट, पेण जि.रायगड यांच्यावतीने कोकण विभागीय माहिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना संस्थेचे अध्यक्ष मनोज गावंड यांच्या हस्ते आज कोरोना संरक्षक कीटचे वाटप करण्यात आले.

कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाला असला तरी, तो अद्याप संपलेला नाही. त्याकरीता शासनाने वेळोवेळी कोरोना प्रतिबंधक सूचना जारी केल्या आहेत. ओमायक्रोन सारख्या कोरोनाच्या नव्या व्हेरिएंटपासून संरक्षण होण्यासाठी प्रत्येकाने स्वत:ची काळजी घेणे म्हणजेच मास्कचा योग्य वापर, सतत हात धुणे, सुरक्षित अंतर ठेवणे या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट, पेण जि.रायगडचे अध्यक्ष मनोज गावंड यांनी आज विभागीय माहिती कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना संरक्षक कीटचे वाटप केले. या कीटमध्ये रबरी हात मोजे, मास्क, सॅनिटायझर, साबन अशा चांगल्या दर्जाच्या वस्तूंचा समावेश आहे. यावेळी कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे, प्रविण डोंगरदिवे, वनिता कांबळे, गंगाराम बांगारा, राम गोंदके, प्रशांत गावंड, राजश्री वाडेकर आदि उपस्थित होते. सामाजिक संस्थांनी कोरोना काळात केलेल्या उत्तम कार्याबद्दल उपसंचालक डॉ.गणेश मुळे यांनी त्यांचे आभार मानले.

### नवीन वर्षाच्या स्वागतावर कोरोनाचे सावट

# नियमांचा भंग केल्यास कारवाई करणार : सचिन गोसावी



**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत आपण सर्वांनीच कोरोनाचा अतिशय सक्षम पणे प्रतिकार केला आहे. प्रशासकीय यंत्रणेतील सर्व घटकांनी सर्वतोपरी आत्म समर्पक भावनेने करोना कालावधीत काम केलं आहे. त्याबद्दल मी आपणा सर्वांचे अभिनंदन करतो. मात्र अजूनही कोरोना सोबत ची लढाई आपली संपलेली नाही. कोरोना नवीन रूपाने आपल्या समोर येत आहे त्या कारणास्तव आपण सर्वांनी पुन्हा एकदा पूर्ण शक्ती ने कोरोना चा सामना करायचा आहे. नवीन वर्षाचे स्वागत करत असताना नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्ती विरोधात प्रशासकीय कारवाई केली जाईल असे प्रतिपादन श्रीवर्धनचे तहसीलदार सचिन गोसावी यांनी केले आहे.

तालुक्यात विविध प्रशासकीय यंत्रणेतील कार्यरत असणाऱ्या अधिकारी वर्गाना तहसीलदार यांनी मार्गदर्शन केले गोसावी म्हणाले,कोरोना अजून पूर्णतः संपलेला नाही अशा प्रसंगी विनाकारण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींविरोधात प्रशासनाने कारवाई करण्याची सूचना रायगडचे जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर यांच्याकडून देण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सूचनांचे तंतोतंत अंमलबजावणी केली जाईल. श्रीवर्धन तालुक्यात नवीन वर्षाच्या स्वागतासाठी विविध भागातून समुद्रकिनाऱ्यांवर लोकांची गर्दी निदर्शनास येते. गर्दी म्हणजे विनाकारण कोरोनाला दिलेले आमंत्रण आहे. गर्दीमुळे कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. आज मितीस श्रीवर्धन तालुक्यात कोरोना विषाणू ला योग्य पायबंद घालण्यात आपण सर्वजण यशस्वी झालो आहोत. असे सचिन गोसावी यांनी सांगितले आहे.

लसीकरण अपूर्ण असणे, मुख्य पट्टी परिधान करण्यास टाळाटाळ करणे, सामाजिक अंतर न राखणे, या बाबींकडे प्रशासनाचे लक्ष आहे.

कुणीही कायद्याचा भंग केल्यास त्या विरोधात तात्काळ कारवाई केली जाईल. खाजगी क्लासेस, हॉटेल्स, शाळा, धार्मिक स्थळे जिथे जिथे गर्दी होते त्या सर्व ठिकाणी कोरोना नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

नववर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबर ला विविध ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमावला जातो त्या मधून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका आहे. सर्व व्यवसायिकांनी कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे अन्यथा प्रशासनाकडून कारवाईचा बडगा उगारला जाईल असे सचिन गोसावी यांनी सांगितले आहे.

## कामोठ्यात झाडांच्या छाटणीनंतर फांद्या पदपथांवरच

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विजवाहक तारांना अडसर निर्माण करणाऱ्या तारा हटविण्याचे काम महावितरण कंपनीकडून हाती घेतले जाते. त्यानुसार महावितरण कंपनीने कामोठयातील से–१७ पटेल प्लाझाप–ासुन ते मानसरोवर स्टेशन ब्रिजपर्यतच्या परिसरातील विजतारांना अडथळा ठरणाऱ्या पदपथालगतच्या झाडांची छाटणी केली. मात्र कंपनीकडून छाटणी केलेल्या फांद्या तेथील पदपथावर, जैसे थे टाकण्याचे प्रकार करण्यात आले आहेत.

या फाद्यांची विल्हेवाट लावायची जबाबदारी कंपनी अथवा त्यांचे ठेकेदार घेत नसल्याने याठिकाणचे फुटपाथवर झाडांच्या फाद्यांनी कचरामय झाले आहेत. तसेच या प्रकारामुळे लोकांना नाईलाजाने रस्त्यावरून चालण्याची वेळ येवून अप–घातास निमंत्रण मिळते. ही बाब लक्षात घेता, महावितरण कंपनीने छाटणी केलेल्या फांद्यांची छाटणीनंतर लगेच योग्य ठिकाणी विल्हेवाट लावावी अथवा संबंधित ठेकेदाराला हा कचरा घेवून जाण्याच्या सुचना कराव्यात, जेणेकरुन नागरिकांची गैरसोय टळेल.असे याविषयी बोलतांना समाजसेविका रंजना सडोलीकर यांनी सांगितले.



# बँक कर्मचाऱ्यांचा खासगीकरणाच्या विरोधात पनवेलमध्ये संप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बँक कर्मचाऱ्यांचा खासगीकरणाच्या विरोधात पनवेलमध्ये संप पुकारण्यात आला. युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनच्या वतीने १६ व १७ डिसेंबर २०२१ या दोन दिवसीय देशव्यापी संपाची हाक देण्यात आली. हा संप प्रामुख्याने संसदेच्या हिवाळी अधिवेशनात जे बँकिंग कायदा अधिनियम २०२१ विधायक मांडण्यात येत आहे त्या विरोधात आहे.



बँकिंग कायदा अधिनियम २०२१ हे विधेयक मंजूर झाले तर सरकारकडून करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील घोषणेनुसार आय. डी.बी.आय. आणि दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खासगीकरण करणे शक्य होईल आणि तदनुसार उर्वरित सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खासगीकरण करण्यात येईल. तसेच हे विधायक पारित झाले तर बँकांमध्ये असलेल्या सर्व सामान्यांच्या जनतेच्या ठेवी धोक्यात येतील. शेतकरी, शेतमजूर, कामगार व गरीब जनतेला आर्थिक सोयी सवलतींपासून वंचित राहावे लागेल म्हणून सर्वसामान्य जनतेने सुद्धा या लढ्यात सहभागी होणे गरजेचे आहे असे यु.एफ.बी.यु.च्या वतीने आवाहन करण्यात आले.

या प्रसंगी संघटने तर्फे बँक बचाव, देश बचाव हा संदेश सर्व सामान्यांना देऊन सरकारचे लक्ष्य वेधण्यात येईल असे संघटनेचे पदाधिकारी अरविंद मोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. अरविंद मोरे यांनी बँक कर्मचाऱ्यांच्या संपाबद्दल सविस्तर माहिती सांगितली.

सदर निदर्शने बँक ऑफ महाराष्ट्र, पनवेल शाखे समोर देण्यात आली. याप्रसंगी विविध बँकांचे बँक कर्मचारी अरविंद मोरे, अमोल पवार, कमलेश सराफ, गोपीचंद पाटेकर, आकाश शिरवय्या, मीनाक्षी भाकरे, संदीप्ती साहू, स्वाती परब, अभिषेक परब, वामनराव गायकवाड, अस्मिता गुणे, राजू म्हात्रे, कमालिनी महाजनी, मधुकर बनसोडे, दत्ता डावरे, कमल खैरे, सीमा मराठे, गीता वर्दम, शिवाजी दळवी, संदीप पाटील आणि सुबोधकुमार उपस्थित होते.

## चिरनेर- कातळपाडा येथील दत्त मंदिर जिर्णोद्धाराचा दिमाखदार सोहळा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

कातळपाडा ग्रामस्थांच्या एकीमुळेच आणि जिद्दीमुळेच अशक्य असणाऱ्या मंदिराचे काम अवघ्या आठ महिन्यातच पुर्ण झाले. अंत्यत सुबक आणि देखणे असे मंदिर गावकऱ्यांनी उभारले असून कातळपाडा ग्रामस्थांच्या एकीचा आदर्श इतरांनी घ्यावा असे प्रतिपादन कामगार नेते आणि रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी चिरनेर कातळपाडा येथे केले.



चिरनेर कातळपाडा येथे नव्याने जिर्णोद्धार केलेल्या दत्त मंदिराचा लोकार्पण सोहळा कामगार नेते महेंद्र घरत आणि उद्योगपती पी.पी. खारपाटील यांच्या हस्ते काल करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. हाती काहीही पैसे नसताना गाव–ातील नवख्या तरूणांनी या दत्त मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी कंबर कसली होती. आणि गावकऱ्यांच्या सहकार्यांने अवघ्या आठ महिन्यातच अंत्यंत देखणे मंदिर उभे केले. त्या उभारलेल्या देखण्या मंदिराचे सर्व उपस्थितांनी कौतूक केले.

या कार्यक्रमाला उद्य–ोगपती राजेंद्र खारपाटील यांनी स्वखर्चाने मंदिरा समोर सुसज्ज सभामंडप बांधून देण्याचे आश्वासन दिले. या कार्यक्रमाला महेंद्र घरत, उद्योगपती पी.पी. खारपाटील, राजेंद्र खारपाटील, शिवसेना तालुका प्रमुख संतोष ठाकूर, पंचायत समिती उपसभापती शुभांगी पाटील, जि.प. सदस्य बाजिराव परदेशी, चिरनेरचे सरपंच संतोष चिर्लेकर, शेकाप चिटणीस सुरेश पाटील, माजी उपसभापती भास्कर मोकल, भाजपा महिला आघाडी तालुका अध्यक्षा राणी म्हात्रे, उपसरपंच प्रियंका गोंधळी आदी मान्यवर उपस्थित होते.

## कामोठे सेक्टर-३४ मधील रस्त्याचे डांबरीकरण, फुटपाथ दुरुस्ती करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या अनेक वर्षापासून दुरुस्ती झाली नसल्यामुळे कामोठे, सेक्टर– ३४ मधील रस्त्यांची रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. रस्त्यावर अनेक धोकादायक खड्डे पडले आहेत. तसेच खड्ड्यांमुळे दुचाकी घसरल्याच्या अनेक रहिवाशांच्या तक्रारी आहेत. याशिवाय सेक्टर–३४ मधील बऱ्याच ठिकाणी फुटपाथ देखील तुटलेले आहेत. त्यामुळे या फुटपाथवरुन चालणे अवघड झाले आहे. खराब, तुटलेल्या फुटपाथमुळे पादचाऱ्यांना रस्त्यावरुन चालण्याचा धोका पत्करावा लागतो. यामुळे फुटपाथची देखील दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने कामोठे, सेक्टर–३४ मधील रस्त्यांचे डांबरीकरण आणि पदपथ दुरुस्तीसाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी प्रगती हाईटस्, शिवगंगा सोसायटी, श्रेय रेसिडेन्सी, शिव तेज, शिवकृपा सोसायटी, तुलसी अव्हेन्यू, सानिध्य सोसायटी, सिध्दीविनायक सोसायटी, रिद्दी सिध्दी चालनी, ओम साई अंगण, रवी रचना कॉर्नर, एकदंत अपार्टमेंट, रवेची दर्शन या गृहनिर्माण संस्थांद्वारे नगरसेवक विकास घरत यांना निवेदन देण्यात आले होते. त्यानुसार नगरसेवक विकास घरत यांनी या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत 'सिडको'चे कार्यकारी अभियंता रामोड यांची भेट घेऊन कामोठेतील सदर समस्या निवारण्याची मागणी करीत निवेदन दिले. याप्रसंगी शेखर जगताप, रवींद्र पाधी, सुनील चौधरी, महेंद्र चव्हाण, दिलीप काळे, विजय सरगर, पप्पू यादव, आदि विविध गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.


मा.मुजावर सो.कोर्ट

अ‍ॅड.वैशाली सुळेभाविकर
अ‍ॅड.दर्शन पाठारे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१७९२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०१/२०२२

१) श्रीमती.जिजाबाई शांताराम पाटील
वय : ७३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.बामणडोंगरी, पोस्ट : वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६
२) श्रीमती.बेबी अंकुश नाईक
कु.बेबी शांताराम पाटील (लग्नापूर्वीचे नाव)
वय : ६० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.६१४, बामणडोंगरी, सेक्टर १९/बी,
पोस्ट : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
३) कु.मरुबाई शांताराम पाटील
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.वरची आळी, हनुमान मंदिर जवळ,
बामणडोंगरी, पोस्ट : वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६
४) श्री.अनिल शांताराम पाटील
वय : ४७ वर्षे, व्यवसाय :
रा.बामणडोंगरी, पोस्ट : वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६
५) श्री.गणेश शांताराम पाटील
वय : ४४ वर्षे, व्यवसाय :
रा.बामणडोंगरी, हनुमान मंदिर समोर,
पोस्ट : वहाळ, उलवे नोड, पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६
६) श्री.दिनेश शांताराम पाटील
वय : ३८ वर्षे, व्यवसाय :
रा.सेक्टर १९/बी, उलवे नोड,
बामणडोंगरी, पोस्ट : वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६
७) श्री.चंद्रकांत शांताराम पाटील
वय : ३७ वर्षे, व्यवसाय :
रा.बामणडोंगरी, पोस्ट : वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६
८) सौ.अनिता सुरेश म्हात्रे
कु.अनिता शांताराम पाटील (लग्नापूर्वीचे नाव)
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.घर नं.११९४, जिजामाता हॉस्पिटल जवळ,
जासई, रायगड, महाराष्ट्र–४१०२०६
९) सौ.शोभा मदन म्हात्रे
कु.शोभा शांताराम पाटील (लग्नापूर्वीचे नाव)
वय : ४९ वर्षे, व्यवसाय :
रा.बामणडोंगरी, पोस्ट : वहाळ,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र–४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार यांचे पती व अर्जदार नं.२ ते ९ यांचे वडील कै.शांताराम बामा पाटील हे दि.३०/०३/२०२१ रोजी मयत झाले असून अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. तसेच त्यांची आई त्याचे अगोदर मयत झालेली आहे.

कै.शांताराम बामा पाटील यांचे नावे व मालकीच्या खालील मिळकती होत्या. सदर मिळकत त्यांचा हिस्सा होता व आहे. परंतु ते मयत झाल्याने सदर मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदारांना मिळावा म्हणून सदर मिळकतीत असलेल्या हिश्श्याबाबत अर्जदारांनी वारस दाखला मिळावा यासाठी अर्ज केला आहे. सदरच्या कै.शांताराम बामा पाटील यांचे नावे असलेल्या मिळकती खालीलप्रमाणे :–

**अ) मिळकतीचे वर्णन**

| मौजे | निवाडा क्र. | सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| वहाळ | वहाळ १–५१ | ३२०/४ | ०–२६–३ |
| | | ३२१/४ अ | ०–१३–० |
| | | ३२१/६ | ०–०६–० |

सदरच्या मिळकती नवीमुंबई विमानतळासाठी संपादीत झालेल्या असून त्याचे मोबदल्यात सिडकोतर्फे २२.५ टक्के योजनेंतर्गत मौजे : उलवे नोड येथील सेक्टर २६ मधील भूखंड नं.१६, क्षेत्र ७२० चौ.मी.चा भूखंड इरादीत केलेला आहे.

**ब) मिळकतीचे वर्णन**

| मौजे | निवाडा क्र. | सर्व्हे / हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| वहाळ | वहाळ ११९ | ३५३/२ | ०–४५–० |

सदरच्या मिळकती नवीमुंबई विमानतळासाठी संपादीत झालेल्या असून त्याचे मोबदल्यात सिडकोतर्फे २२.५ टक्के योजनेंतर्गत मौजे : पुष्पकनगर येथील सेक्टर ३ मधील भूखंड नं.२७५, क्षेत्र ७१० चौ.मी.चा भूखंड इरादीत केलेला आहे.

सदर मिळकती ह्या अर्जदार यांचे वडील कै.शांताराम बामा पाटील यांचे नावे व मालकीच्या होत्या. सदर मिळकतीत सदर मिळकतीत त्याचा हिस्सा होता व आहे. परंतु ते दि.३०/३/२०२१ रोजी मयत झाले असल्याने तसेच त्यांची आई ह्या देखील मयत झालेले असल्याने त्यांचे पश्चात सदरचे मिळकतीत कै.शांताराम बामा पाटील यांचा असलेल्या हक्काबाबत अर्जदारांस वारसदाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कै.शांताराम बामा पाटील यांचे नावे असलेल्या वर नमूद केलेल्या मिळकतीत त्यांचा असलेला हिस्सा व हक्कास अर्जदार हे शांताराम बामा पाटील यांचे कायदेशीर वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनुसार अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य घेतली जाणार नाही.

आज दि.१७/१२/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्याने दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**



अ‍ॅड.सुलक्षणा जगदाळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.१३१०/२०२२
ने.ता.१३/०१/२०२२

श्री.दत्तात्रय वसंत वाघमोडे, वय : ३३ वर्षे
धंदा : नोकरी, रा.सुरजहर्ष सोसायटी,
प्लॉट नं.३६, रुम नं.१०३, सेक्टर ५,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आजी कै.हिराबाई मनोहर पुकळे यांचा मृत्यू दि.१५/०७/२०१५ रोजी यांच्या राहत्या घरी रा.सुरजहर्ष सोसायटी, प्लॉट नं.३६, रुम नं.१०३, सेक्टर ५, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ येथे झालेला आहे आणि अर्जदार यांनी यांची आजी कै.हिराबाई मनोहर पुकळे यांच्या मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.हिराबाई मनोहर पुकळे वर नमूद ठिकाणी मयत झालेली आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कुणाची हरकत असेल, तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलामार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर मुदतीमध्ये हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून त्यांस सदरहू व्यक्तीच्या मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.०७ माहे डिसेंबर २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**



राव साहेब

प्रो.जमा.६–२५

अर्जदाराचे वकील
अ‍ॅड.सागर गोंधळी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१९०१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०२/०२/२०२२

१) श्री.यागेश कुमार दिनेश कुमार शर्मा
वय : ३० वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्रीमती.आशा दिनेश कुमार शर्मा
वय : ६० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
दोघेही रा.डी.३९, सिडको कॉलनी,
शिव मंदिर समोर, ऐरोली, ता.जि.ठाणे अर्जदार

ज्याअर्थी कै.दिनेश कुमार रिद्धी शर्मा हे दि.०७/०६/२०१८ रोजी डी ३९, सिडको कॉलनी, सेक्टर–३, शिव मंदिर समोर, ऐरोली, ता.जि.ठाणे येथे खालील वर्णनाची घर मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**रुम नं.३०१, तिसरा मजला, गुडलक अपार्टमेंट, (जी+४), प्लॉट नं.१३८/१३९, सेक्टर–२, क्षेत्र ४३.३८४ चौ.मी. (बिल्टअप एरिया), तळोजे पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.दिनेश कुमार रिद्धी शर्मा यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असून त्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.सोनावणे सो.

अ‍ॅड.दिनानाथ कै. सोनकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.१९२६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२८/०१/२०२२

श्री.सागर मारुती भोसले
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.सी/२०६, श्री गणेश प्लाझा–१,
प्लॉट नं.१, सेक्टर १, न्यू पनवेल (प),
खांदा कॉलनी, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड–४१०२०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

वरील अर्जदार श्री.सागर मारुती भोसले रा.सी/२०६, श्री गणेश प्लाझा–१, प्लॉट नं.१, सेक्टर–१, न्यू पनवेल (प), खांदा कॉलनी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड–४१०२०६, अर्जदार यांचे वडील कै.मारुती श्रीपती भोसले हे दि.१०/०६/२०१३ रोजी बेल एअर हॉस्पिटल पांचगणी, तालुका : महाबळेश्वर, जिल्हा : सातारा येथे निधन झाले असून सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क्र.२०६, विंग–सी, दुसरा मजला, श्री गणेश प्लाझा–१, को. ऑप.हौ.सोसायटी लि., प्लॉट नं.१, सेक्टर–१, न्यू पनवेल (प.), खांदा कॉलनी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६. क्षेत्रफळ ५६३ स्क्वे.फूट (४३ स्क्वे.मीटर बिल्टअप) एकूण किंमत रु.७,००,०००/– (रुपये सात लाख फक्त)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१६/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## आज पिंपळवाडी-देवकान्हे येथे दत्तजयंती सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील पिंपळवाडी-देवकान्हे येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री दत्तजयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या उत्सवातंर्गत श्री. गुरू दत्तात्रेय जन्मोत्सव, सायं.रोहे तालुका कोकणदिंडी वारकरी सांप्रदाय यांचे हरिपाठ तद्नंतर महाप्रसाद व रात्रौ.९ वा.ह.भ.प.दिनेशमहाराज कडव यांचे हरिकिर्तन आदी धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत.या सर्व कार्यक्रमांचे यशस्वीतेसाठी पिंपळवाडी-देवकान्हे ग्रामस्थ, महिला व तरुण मंडळाचे सदस्य मोलाचे सहकार्य करीत आहेत.

## बोर्ली ग्रामपंचायतीत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील बोर्ली ग्रामपंचायत व साळाव जेएसडब्ल्यू कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने बोर्ली ग्रामपंचायत कार्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

ग्रामपंचायत सरपंच चेतन जावसेन, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वामन चुनेकर, पंचायत समितीचे माजी सभापती रमेश नागावकर,सी.एम.ठाकूर, मनोहर भोपी,जेएसडब्ल्यू कंपनी तज्ञ डॉ.अजय पावरा व त्यांची टिम तसेच मान्यवर ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी साळाव जेएसडब्ल्यू कंपनी तज्ञ डॉ.अजय पावरा व त्यांच्या टिमने बोर्ली मांडला परीसरातील लोकांची आरोग्य तपासणी केली.यावेळी रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली. परीसरातील ८६ लोकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

# नेरळ ग्रामपंचायतमध्ये शिवसेनेची एक हाती सत्ता असताना कोणाची वर्णी लागेल उपसरपंच पदासाठी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या नेरळ ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदासाठी येत्या आठवड्यात निवडणूक होणार आहे.मावळते उपसरपंच शंकर घोडविंदे यांनी राजीनामा दिल्याने नेरळ ग्रामपंचायत मध्ये आता सार्वत्रिक निवडणूक लढताना दिलेले शब्द पाळले जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान,या उपसरपंच निवडणुकीनंतर आगामी काळात कर्जत तालुक्यातील आघाडी आणि युतीच्या राजकारणाची दिशा निश्चित होणार आहे.

२०१९ मध्ये नेरळ ग्रामपंचायतची सार्वत्रिक निवडणूक लोकसभा निवडणूक झाल्यावर झाली होती. ऑगस्ट २०१९ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत थेट सरपंच म्हणून शिवसेनेचा उमेदवार विजयी झाला होता. त्यावेळी सेनेचे सात आणि भाजपचे चार सदस्य विजयी झाले होते.त्यानंतर युती च्या सर्वसाधारण नियमानुसार एका पक्षाचा सरपंच तर दुसऱ्या पक्षाचा उपसरपंच अशी साधारण रचना असते. माथेरान शिवसेनेच्या तालुका नेतृत्वाने उपसरपंच पद भारतीय जनता पक्षाला देण्यास विरोध केला आणि सेनेच्या सदस्याला उपसरपंच पदाची उमेदवारी दिली.मात्र त्यावेळी नाराज झालेल्या भारतीय जनता पक्षाने शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते अपक्ष सदस्य शंकर घोडविंदे यांना साथ दिली आणि सेनेचा उमेदवाराचा पराभव



केला. त्यामुळे थेट सरपंच एका पक्षाचा आणि उपसरपंच सत्ताधारी गटाच्या विरोधी गटाचा अशी नेरळ ग्रामपंचायतीची स्थिती होती. आजाराने त्रस्त असलेले थेट सरपंच झालेले रावजी शिंगवा यांचे निधन झाले असता नेरळ ग्रामपंचायत मध्ये राजकीय घडामोडी घडल्या आणि शिवसेना अर्धा गट,भाजप,शेकाप अपक्ष,आरपीआय आठवले गट यांनी एकत्र आले आणि नेरळ ग्रामपंचायतचे सरपंच पद या आघाडीने बिनविरोध मिळविले.मात्र शिवसेनेचे काही सदस्य हे सत्तेबाहेर होते आणि आजही आहेत.

मात्र उपसरपंच यांचा राजीनामा झाल्याने यावेळी २०१९ मध्ये हुकले उपसरपंच भारतीय जनता पक्षाच्या वाटायला जाण्याची शक्यता आहे.२०१९च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जे घडायला हवे होते ते या आठवड्यात अपेक्षित असून त्यामागे जुलै २०२१ मध्ये उषा पारधी यांना सरपंच पदावर बसविताना दिलेला शब्द आणि आगामी रायगड जिल्हा परिषद आणि कर्जत पंचायत समितीची सार्वत्रिक निवडणूक लक्षात घेता रणनीतीचा भाग म्हणून हे शिवसेनेकडून करण्याचा प्रयत्न असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.त्याबाबत सुरु असलेल्या हालचाली लक्षात घेता नेरळ ग्रामपंचायतमध्ये शिवसेनेचा सरपंच यांच्या जोडीला भारतीय जनता पक्षाच्या जेष्ठ सदस्याला उपसरपंच केले जाणार आहे. सध्या सत्ताधारी शिवसेना-भाजप-आरपीआय आठवले गट-अपक्ष शेतकरी कामगार पक्ष यांच्या आघाडीकडे तेराचे बळ आहे. तर शिवसेनेचे तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेस चे दोन असे अन्य पाच सदस्य असून त्यांच्याकडून कि उमेदवार दिला जाण्याची शक्यता आहे याबाबत अद्याप कोणत्याही हालचाली सुरु नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नेरळ ग्रामपन्चायत वर सत्ताधारी नेरळ विकास आघाडीचा सदस्य तेथील रिक्त असलेल्या उपसरपंच पदावर बिनविरोध निवडला जाईल अशी राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे.

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत,त्यावेळी तालुक्यातील राजकारणावर आपला अंकुश असावा यासाठी शिवसेनेचे आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडून रणनीती आखली जात आहे. त्यात आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला शेतकरी कामगार पक्ष आणि भारतीय जनता पक्षाची साथ मिळाली पाहिजे यासाठी नेरळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच पद भारतीय जनता पक्षाच्या बसदस्याला दिले जाणार हे जवळपास नक्की आहे. कारण कर्जत पंचायत समितीमध्ये शिवसेनेचे बहुमत असताना शेतकरी कामगार पक्षाला उपसभापती पद देऊन शेकापबरोबर जवळीक साधण्याचा प्रयत्न शिवसेना करताना दिसली आहे. आता भारतीय जनता पक्षाला जवळ करण्याचा शिवसेनेचा प्रयत्न दिसून आला आहे.

## रयत शिक्षण संस्थेचे मानद सचिव पै. इस्माईलसाहेब मुल्ला यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेचे मानद सचिव पै. इस्माईलसाहेब मुल्ला यांचा पुण्यतिथी कार्यक्रम सातारा येथील संस्था कार्यालयात व त्यांच्या समाधी स्थळावर आयोजित करण्यात आला होता.



यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, ऑडिटर डॉ. शिवलिंग मेनकुदळे, कायदा सल्लागार ॲड. डी. आय. एस. मुल्ला, यांच्यासह प्राचार्य शहाजी डोंगरे, समन्वयक डी. एल. सुर्यवंशी, वाय. सी. कॉलेजचे प्राचार्य बी. टी. जाधव, प्राचार्य डॉ. अत्तार आणि रयत सेवकांनी कार्यालयात तसेच समाधी स्थळावर पै. इस्माईलसाहेब मुल्ला यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.

## सक्तीच्या वॅक्सीन घेण्याच्या शासनाच्या निर्णया विरोधात बहुजन मुक्ती पार्टीचे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात २० डिसेंबर रोजी निदर्शने

**दै.रायगड नगरी । उरण**

सर्वोच्च न्यायालयात केंद्र शासनाने वॅक्सीन घेणे देशातील कोणत्याही नागरिकांना सक्तीचे नाही याबाबत अफिडीव्हेट दिले आहे. तसेच मणिपूर, कर्नाटक, गुजरात व राजस्थान येथील माननीय उच्च न्यायालयाने वॅक्सीन सक्ती संदर्भात वॅक्सीन सक्तीचे केले जाऊ शकत नाही. सक्ती करणे भारतीय संविधान कलम १४,१९ व २१ चे उल्लंघन आहे. असे निकाल दिले आहे. असे असताना महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी व इतर विभाग प्रमुख यांनी कर्मचारी, कामगार, मजूर यांना वॅक्सीन(लस /औषध )घेणे सक्तीचे केले आहे.



या विरोधात बहुजन मुक्ती पार्टी, राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ राज्य शाखा व मुख्य शाखेच्या उपशाखा व इतर कर्मचाऱ्यांच्या संघटना हे एकत्र येऊन दिनांक २०/१२/२०२१ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी एकाच वेळी दुपारी १२:३० ते ३:३० या वेळेत निदर्शने करणार आहेत. यावेळी संपूर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात येणार आहे. याबाबत उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांना राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघांचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष संतोष घरत, जिल्हा संयोजक गणेश पाटील आदी पदाधिकाऱ्यांनी निवेदन दिले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांच्या कोर्टात टी. जे. भानू विरुद्ध राज्य पीआयएल(एल ) क्रमांक ११४७३ च्या २०२१ प्रकरणाच्या सुरु असलेल्या सुनावणी दरम्यान १३ सप्टेंबर २०२१ रोजी भारत सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की कोणतीही व्यक्ती मानसिक दृष्ट्या सक्षम असली तरीही सरकार कोणत्याही व्यक्तीला त्याच्या संमती शिवाय लस देऊ शकत नाही. आणि व्यक्ती जर मानसिक दृष्ट्या अक्षम असेल तर त्याच्या कुटुंबातील सदस्यांची किंवा डॉक्टरांची संमती लसीकरणासाठी आवश्यक आहे. कोणतेही सरकार त्या व्यक्तीच्या संमती शिवाय लस देऊ शकत नाही. तथा कोणतेही औषध घेण्यास भाग पाडू शकत नाही. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाकडून वॅक्सीन घेणे सक्तीचे केले जात असल्याने व सर्वसामान्य नागरिकांना विविध सेवा सुविधा पासून वंचित ठेवत असल्याने सदर शासनाविरोधात निदर्शने करण्यात येणार असल्याची माहिती राज्य उपाध्यक्ष संतोष घरत, जिल्हा संयोजक गणेश पाटील, उपजिल्हा अध्यक्ष भारतीय युवा मोर्चा प्रकाश शरणागत यांनी दिली आहे.

## पनवेलमधील वाकडी गावाच्या जंगलात बिबट्या दिसल्याच्या चर्चेने ग्रामस्थांमध्ये घबराट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमधील वाकडी गावात गेल्या काही दिवसांपूर्वी एका चौकीदाराने दोन बिबटे दिसल्याचा दावा केल्यानंतर या परिसरातील ग्रामस्थांमध्ये सध्या भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, बिबट्या दिसल्याची ही माहिती वन विभागाला प्राप्त होताच, वन अधिकाऱ्यांनी, त्या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली असता, वन अधिकाऱ्यांना बिबट्या दिसला नसल्याचे सांगण्यात येते. मात्र खबरदारी म्हणून वनविभागाकडून परिसरात गस्त वाढविण्यासह सर्व त्या उपाय योजना करण्यावर भर दिला जात असल्याचे पनवेल विभागाचे परिक्षेत्र वन अधिकारी सोनावणे यांनी सांगितले.



पनवेलमधील वाकडी गावात गेल्या रविवारी एका चौकीदाराकडून त्याला दोन बिबटे दिसल्याचे सांगितले जात आहे. या माहितीवरून वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी परिसरात गस्त वाढवली आहे. तसेच परिसरातील रहिवाशांना विशेषत: रात्रीच्या वेळी अत्यावश्यक नसल्यास घराबाहेर न पडण्याचा सल्ला वनविभागाने दिला आहे. दरम्यान पनवेलमधील नेरे गावातील दोन रहिवाशांनी त्यांच्या परिसरात बिबट्या दिसल्याचा दावा केला होता. याबाबत बोलतांना पनवेल विभागाचे परिक्षेत्र वन अधिकारी ज्ञानेशर सोनवणे म्हणाले, फार्महाऊसवर काम करणाऱ्या चौकीदाराने आम्हाला रविवारी रात्री फार्महाऊसच्या बाहेर दोन बिबटे फिरताना दिसल्याची माहिती दिली. या माहितीवरुन विभागाकडून जवळच्या जंगलात प्राण्यांचा शोध घेत आहोत.

तसेच त्या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, त्यात बिबटे दिसले नाहीत. मात्र खबरदारी म्हणून वनविभागाकडून या भागात गस्त वाढविण्यासह स्थानिक रहिवाशांना सावधनतेचा इशारा दिला आहे. सोनवणे यांच्या म्हणण्यानुसार, सुमारे दोन वर्षांपूर्वी, तळोजा एमआयडीसीमधील एका औद्योगिक साईटवर पनवेलपासून सुमारे ८ किमी अंतरावर असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी कंपाऊंडमध्ये बिबट्या घुसल्याचे फुटेज टिपले होते. पुढील एक आठवडा वन अधिकाऱ्यांनी त्यांचा शोध घेतला, मात्र त्याचा शोध लागला नाही. माथेरानच्या डोंगरात बिबटे आहेत आणि कधी कधी ते शहरी भागाकडे येतात. मात्र असे असले तरी गेल्या अनेक वर्षांपासून आम्हाला पनवेलच्या जंगलात बिबट्या दिसला नसल्याचेही सोनावणे यांनी सांगितले.

## युवा सेनेच्या दणक्यानंतर सिडकोने खारघर वसाहतीमध्ये केली नागरी समस्या सोडविण्यास सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

युवा सेनेच्या दणक्यानंतर खारघर वसाहतीमधील विविध नागरी समस्या सोडविण्यास सिडकोने सुरूवात केली आहे.

खारघर शहरातील रस्ते दुरूस्ती ड्रिनेज सफाई व वृक्ष छाटणी करूण मिळण्यासंदर्भात यावेळी युवासेना पदाधिकारी युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, उपविधानसभा अधिकारी अनिकेत पाटील , खारघर शहर अधिकारी विनोद पाटील, शहर चिटणीस मिथुन पाटील, विभाग अधिकारी प्रेम ठाकुर, निखील पानमंद , अजय कदम , संतोष शिंदे , सागर जाधव , योगेश महाले ,सुधीर शिंदे , विजय रोकडे , समीर वर्गट , अश्वीन ससाने , सुदर्शन खंडागळे , आदींनी सिडकोच्या अधिकाऱ्यांची भेट घेवून या नागरी समस्या मांडल्या. त्यामध्ये प्रामुख्याने खारघर शहरामधील सेक्टर १ ते सेक्टर २४ या विभागातील पावसाळ्यामुळे रस्त्यांची खुपच दुरावस्ता झालेली आहे. खारघर शहरामधील कोणत्याही रोड वरती प्रवास केल्यास जागो जागी पडलेले खडडे वेगवेगळ्या कंपन्या मार्फत खणलेले खडडे व चरी तसेच बऱ्याच रोडवरती तर डांबर नावाचा प्रकारच राहिलेला नाही. त्यात पावसाळ्यामुळे पडलेले खडडे या सर्व बाबी मुळे वाहनांची होणारी झीज सर्वात महत्वाचे सर्व सामान्य व्यक्ती पासुन ते हाय प्रोफाईल व्यक्ती पर्यंत या खराव रोडमुळे होणारे शारिरिक आजार व्याधी तसेच रिक्षा वाहक व दुचाकी वाहन चालक यांचे होणारे अपघात व त्यांना होणारी आयुष्यभराची दुखापत या सर्व बाबींना कोण जबाबदार आहे, असा सवाल त्यांनी केला.

गेल्या कित्येक वर्षा पासून खारघर शहरातील मुख्य रस्ते . मुख्य बाजार पेठा मुख्य चौक , सार्वजनिक ठिकाणे या ठिकाणी वरिल प्रमाणेच परिस्थिती आहे . त्यामुळे खारघर शहर वासीयांना रस्ता खराबी मुळे असंख्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे . त्याच प्रमाणे पावसाळ्यामुळे खारघर शहरातील मुख्य रोडच्या आजु बाजुला व काही ठिकाणी रोडच्या मध्यभागी असनारी ड्रिनेज व्यवस्ता देखील खुप खराब झालेली आहे . कारण ड्रिनेज तुंबल्यामुळे पाणी व घाण कचरा रस्त्यावर येत असल्याने वाहन चालकांना व पायी प्रवास करणाऱ्या राहीवाश्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे त्याच बरोबर आरोग्याचा देखील प्रश्न ऊदभवत आहे . डेंगु मलेरिया हिवताप या सारख्या साथींच्या आजाराला तोंड दयावे लागत आहे त्यामुळे आर्थिक नुकसानीस देखील सामोर जावे लागत आहे . खारघर शहरामध्ये ब - याच ठिकाणी रोडच्या आजुबाजुला व काही ठिकाणी दोन्ही रोडच्या मध्य भागी लावलेली शोभिवंत झाडे यांची पासाळ्यामुळे झालेली वाढ त्यामुळे वाहन चालकांना व प्रवास करताना या नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे . तसेच अपघातास देखील निमंत्रण देण्यासारखे होत आहे . तरी वरिल तिनही कामांची लवकरात लवकर दुरुस्ती करून खारघर मध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना चांगल्या सोयी देण्यात याव्या अन्यथा खारघर युवा सेना व खारघर शिव सेना यांचे मार्फत आपल्या कार्यालयावरती वरिल तिनही कामासाठी धडक मोर्चा काढावा लागेल असा इशारा दिला होता. या इशाऱ्याची दखल घेत सिडकोने आता प्रत्यक्ष वेगवेगळ्या कामांना सुरूवात केल्याने येथील रहिवाशांनी युवा सेनेचे आभार मानले आहेत.




## ग्रामपंचायत वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा नोटीस

वहाळ ग्रामपंचायत हद्दीतील खालील विकास कामे करण्याकरिता विहित मुदतीमध्ये नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोरबंद पाकिटात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा फॉर्म मिळण्याची अंतिम मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे वहाळ येथील राजिप शाळा येथील पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन दुरुस्ती करणे | ९८१०६ | ९८१ | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| २ | मौजे वहाळ येथील बौद्धवाडा जवळील अंतर्गत पिण्याच्या पाईप लाईन दुरुस्ती करणे | १३५२७४ | १३५२ | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| ३ | मौजे वहाळ येथील बामणडोंगरी अंगणवाडीला पी.वी.सी. वॉटर टँक पाईप लाईन टाकणे | १३२८३६ | १३२८ | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| ४ | मौजे वहाळ येथील राजिप शाळा येथील शौचालय दुरुस्ती करणे | २००००० | २००० | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| ५ | वहाळ येथील चिंचेची विहिरी जवळ परिसर सुशोभिकरण करणे | १००००० | १००० | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| ६ | मौजे मोरावे येथील लांगेश्वर मंदिर जवळ गार्डन सुशोभिकरण करणे | १००००० | १००० | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| ७ | वहाळ साईनगर आदिवासी वाडी येथे बसणेकरिता बाक बसविणे | १३६५८६ | १३६५ | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |
| ८ | राजिप शाळा बामणडोंगरी, जावळे, मोरावे येथे डिजीटल रुम तयार करणे | १९६९०७ | १९६९ | २३/१२/२०२१ दुपारी ३.00 वाजता | २४/१२/२०२१ दुपारी ४.00 वाजेपर्यंत | |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) वरील कामाच्या निविदा मोहोरबंद पाकिटात मा.सरपंच, ग्रामपंचायत वहाळ यांचे नावे दि.२४/१२/२०२१ रोजी संध्याकाळी ४.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

२) ठेकेदार नोंदणीकृत असावा.

३) कोणतीही एक किंवा सर्वच निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

४) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २४/१२/२०२१ रोजी दुपारी ४.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

५) कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारांस कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.

६) सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

सही/-
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत वहाळ

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत वहाळ